नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS


वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २४७ | Issue - 247 | वार सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ | Blow- Monday Date 26 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# २६९६ कोटी रुपयांच्या तूर खरेदीला केंद्राची मंजुरी

## महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारने एक म हत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्यातील ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीला केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मंजुरी दिली आहे.






नवी दिल्ली येथे पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाम ुळे 'किंमत समर्थन योजने'अंतर्गत (झडड) सुमारे २,६९६ कोटी रुपयांच्या निधीतून ही तूर खरेदी केली जाणार असून, याचा थेट लाभ राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मिळणार आहे. या बैठकीस म हाराष्ट्राचे पणन मंत्री जयकुमार रावल आणि केंद्रीय कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे. तूर खरेदीच्या या निर्णयामुळे केंद्रावर मोठा आर्थिक भार पडणार असला, तरी शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळणे ही सरकारची प्राथमि कता आहे. ही खरेदी प्रक्रिया नेफ ेड (छरऋएऊ) आणि एनसीसीएफ (छउउऋ) या संस्थांच्या माध्यमातून राज्य शासनाच्या समन्वयाने राबवली जाईल, असे मंत्री चौहान यांनी स्पष्ट केले.

खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचनाही मंत्र्यांनी यावेळी दिल्या. शेतकऱ्यांची नोंदणी करताना कोणतीही अडचण येऊ नये आणि बिचौलियांचा हस्तक्षेप पूर्णपणे थांबवावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

तसेच, शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. या प्रक्रियेमुळे थेट शेतकऱ्यांकडून खरेदी केली जाण- ार असून, व्यापाऱ्यांऐवजी मूळ उत्पादकांपर्यंत सरकारचा पैसा पो- होचणार आहे.

# केंद्राकडून पुरस्कारांची घोषणा; धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण

मुंबई : केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाकडून २०२६ साठी पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. देशभरातून ५ जणांना पद्मविभूषण, १३ जणांना पद्मभूषण आणि ११३ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील त्या मान्यवरांचं प्राविण्य आणि सेवेसंदर्भात पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.




**भगतसिंह कोश्यारी यांना पद्मभूषण, रघूवीर खेडकर, अशोक खाडे, रोहित शर्माला पद्मश्री**

महाराष्ट्रातील पद्म पुरस्कार विजेत्यांची यादी

पद्मविभूषण

धर्मेंद्रसिंह देओल (मरणोत्तर) : कला

पद्मभूषण

अलका याग्निक : कला, पीयूष पांडे (मरणोत्तर) : कला, उदय कोटक : व्यापार आणि उद्योग

पद्मश्री

श्रीरंग देवबा लाड : कृषी , रोहित शर्मा : क्रीडा , सत्यनारायण नुवाल : व्यापार आणि उद्योग

रघूवीर खेडकर : कला

माधवन रंगनाथन : कला, जुझेर वासी : विज्ञान आणि अभियांत्रिकी

जनार्दन बापुराव बोथे : सम ाजकार्य. भिकल्या लाडक्या धिंडा :कला, अशोक खाडे : व्यापार आणि उद्योग

अर्मिडा फर्नांडिस : वैद्यकीय

पद्मविभूषण पुरस्कार विजेते

१ श्री. धर्मेंद्र सिंह देओल (मरण- ोत्तर) - महाराष्ट्र २) श्री. के. टी. थॉमस - केरळ ३) सौ. एन. राजम - उत्तर प्रदेश ४) श्री. पी. नारायणन - केरळ

५) श्री. व्ही. एस. अच्युतानंदन - केरळ

पद्मभूषण पुरस्कार विजेते

पद्म भूषण (१३)

६) सौ. अल्का याज्ञिक - महाराष्ट्र ७) श्री. भगतसिंग कोश्यारी - उत्तराखंड ८) श्री. कल्लिपट्टी राम ास्वामी पलानीस्वामी - तामिळनाडू ९) श्री. मामूट्टी कला - केरळ १०) डॉ. नोरी दत्तात्रेयुडू- अमेरिका ११) श्री. पियुष पांडे (मरणोत्तर) - महाराष्ट्र १२) श्री. एस. के. एम. मायलनंदन - तामिळनाडू १३) श्री. शतावधानी आर. गणेश - कर्नाटक १४) श्री. शिबू सोरेन (मरणोत्तर) - झारखंड १५) श्री. उदय कोटक - महाराष्ट्र १६) श्री. व्ही. के. मल्होत्रा (मरण- ोत्तर) - दिल्ली १७) श्री. वेल्लापल्ली नटेशन - केरळ १८) श्री. विजय अमृतराज - अमेरिका

पद्मश्री पुरस्कार विजेते

पद्मश्री (११३)

१९) श्री. ए. ई. मुत्थुनायगम - केरळ (पान ४ वर....)

# कॅप्टन शुभांशू शुक्ला यांना अशोक चक्र जाहीर, आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रातील कामगिरीचा सन्मान

नवी दिल्ली : भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी आतंरराष्ट्रीय अवकाश केंद्राला भेट दिली होती. या दरम्यान अवकाश संशोधन केंद्रात त्यांनी केलेल्या कार्याचा सन्मान म्हणून भारत सरकारकडून अशोक चक्र जाहीर करण्यात आलं आहे. शांतता काळातील सर्वोच्च सैन्य सन्मान पुरस्कार अशोक चक्र शुभांशू शुक्ला यांना जाहीर झालं आहे.



शुभांशू शुक्ला यांनी २६ जून २०२५ ला नासाच्या केनेडी स्पेस सेंटर येथून स्पेसएक्स या ड्रॅगन स्पेसक्राफ्ट मधून आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्रात पोहोचत इतिहास निर्माण केला होता. आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्रात पाऊल ठेवणारे ते पहिले भारतीय अंतराळवीर आहेत. तर, राकेश शर्मा यांच्यानंतर अंतराळात पोह- ोचणारे दुसरे भारतीय आहेत. राकेश शर्मा ४१ वर्षापूर्वी अंतराळात गेले होते. शुभांशू शुक्ला यांच्याशिवाय गगनयान मिशनसाठी निवडण्यात आलेल्या चार अंतराळवीरांपैकी ग्रुप कॅप्टन पीबी नायर यांना कीर्ती चक्र जहीर झालं आहे.

शुभांशू शुक्ला १८ दिवसांच्या अंतराळ मोहिमेवर होते. १९८४ मध्ये राकेश शर्मा यांनी रशियाच्या सोयूजमधून अंतराळ प्रवास केला होता. फायटर पायलट म्हणून शुक्ला यांच्याकडे डॉ-३० चघख, चळऋ-२१, चळऋ-२९, गरर्सीरी, क्तुज्ञ, ॲपळशी आणि प-३२ सह विविध (पान २ वर...)

# हक्काचं निधी टक्केवारी घेऊन वागदरी जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य तानवडे यांचे काळे कारनामे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत वागदरी जिल्हा परिषद गटातून निवडून आलेल्या सदस्य आनंद तानवडे वागदरी मतदार संघांसाठी उपलब्ध असलेला हक्काचे निधी ४० टक्के कमिशन घेऊन बार्शी तालुक्यातील १३ गावांना निधी विकणारा माजी जिल्हा परिषद आनंद तानवडेला त्याची जागा मतदार नक्कीच या निवडणुकीत दाखवणारच असे मत आमच्या प्रतिनिधिशी बोलताना सुनील सावंत म्हणाले.

सोलापूर जिल्हा परिषद मध्ये वागदरी गटाचे प्रतिनिधित्व करत असताना आनंद तानव- डे यांनी १. तावडी ,२. रातंजन, ३. इंदापूर ,४. नारेवाडी,५. उकडगांव, ६. श्रीपतपिंपरी, ७. शेंदऱ्ओ, ८. बोरगाव खू , ९. मौ .पिंपरी, १०. मौ. तुर्क पिंपरी,११. घारी,१२. नारी, १३. रऊळगांव




या बार्शी तालुक्यातील १३ गावांना नाला खोलीकरण व सरळीकरण कामाचे चाळीस टक्के प्रमाणे विकून खाल्लेले आ- हेत. निवडून यायचे आपल्या मतदार संघात आणि विकून टक्केवारी खायच बार्शी तालुक्यात. असे कारनामे माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे यांनी केले आहे आता मतदार जागृत झाले असून त्यांनी विकासाचे व्हिजन असणाऱ्या भाजपचे उमेदवार राजेश्री शेळके यांना मोठया मताने निवडून देतील असेही सुनील सावंत यांनी सांगितले.

**महाराष्ट्रातील ८९ अधिकारी-कर्मचाऱ्यांना शौर्य व सेवा पदके जाहीर**

**अमेरिकेकडून मोठे संकेत**

# प्रजासत्ताक दिनी देशातील एकूण ९८२ जणांचा विविध पुरस्काराने सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशातील पो- लीस, अग्निशमन, होमगार्ड आणि सुधारात्मक सेवेतील एकूण ९८२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील एकूण ८९ अधिकारी व कर्मचारी यांना विविध क्षेत्रातील कामगिरीसाठी पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये ३१ पोलीस कर्मचाऱ्यांना 'वीरता पदक' (ऋच्), उत्कृष्ट आणि विशिष्ट सेवेसाठी दिले जाणारे 'राष्ट्रपती पदक' (झडच्) पोलीस दलातील ४ अधिकारी आणि सुधारात्मक सेवा विभागातील २ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. उल्लेखनीय सेवेसाठी (चडच्) महाराष्ट्रातील पोलीस सेवेतील ४०, अग्निशमन सेवेसाठी ४, नागरी संरक्षण व होमगार्ड सेवेतील ३, सुध- ारात्मक सेवेतील ५ या अधिकारी- कर्मचाऱ्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृहमंत्रालयामार्फत दरवर्षी पोलीस, अग्निशमन, होमगार्ड आणि सुधारात्मक सेवेतील कार्यासाठी शौर्य आणि सेवा पदके दिली जातात.

महाराष्ट्राला मिळालेल्या विविध श्रेणीतील पदक प्राप्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी

वीरता पदक (ऋच्)-पोलीस सेवा

१. अमोल नानासाहेब फडतरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, २. वासुदेव राजम मडावी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, ३. मधुकर पोचाय्या नैताम, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकए ४. संतोष वसंतराव नैताम, नाईक पोलीस कॉन्स्टेबल ज ५. कै.सुधाकर बिताजी वेलादी नाईक पोलीस कॉन्स्टेबल (मरणोपरांत) ६. विलास मारोती पोर्तेट नाईक पोलीस कॉन्स्टेबल ७. विश्वनाथ सन्यासी सदमेक, नाईक पोलीस कॉन्स्टेबल ८. ज्ञानेश्वर सदाशिव फाडणे, नाईक पोलीस कॉन्स्टेबल ९. दिलीप वास- ुदेव सद्मेक, नाईक पोलीस कॉन्स्टेबल १०. रामसू देवू नरोटे, नाईक पोलीस कॉन्स्टेबल ११. आनंदराव बाजीराव उसेंडी,नाईक पोलीस कॉन्स्टेबल १२. राजू पंडित चव्हाण, नाईक पोलीस कॉन्स्टेबल १३. अरुण कैलास म ेश्राम, पोलीस कॉन्स्टेबल १४. नितेश गंगाराम वेलाडी, पोलीस कॉन्स्टेबल १५. मोहन लच्छू उसेंडी, पोलीस कॉन्स्टेबल १६. संदिप गणपत वस- ाके, पोलीस कॉन्स्टेबल १७. कैलास देवू कोवासे ,पोलीस कॉन्स्टेबल १८. हरिदास महारू कुलयेती, पोलीस कॉन्स्टेबल १९. किशोर चंती तलांडे, पोलीस कॉन्स्टेबल २०. अनिल रघ- ुपती आलम, पोलीस कॉन्स्टेबल २१. नरेंद्र दशरथ मडावी, पोलीस कॉन्स्टेबल २२. आकाश अश- ोक उईके, पोलीस कॉन्स्टेबल २३. स्वर्गीय करे इरपा आत्राम, पोलीस कॉन्स्टेबल (मरणोपरांत) २४. राजू मासा पुसाळी, पोलीस कॉन्स्टेबल २५. महेश दत्तूजी जकेवार, पोलीस कॉन्स्टेबल २६. रुपेश रमेश कोडापे, पोलीस कॉन्स्टेबल २७. मुकेश शंकर सडमेक, पोलीस कॉन्स्टेबल २८. योगेंद्रराव उपेंद्रराव सदमेक, पोलीस कॉन्स्टेबल २९. घिस्सू वांजा आत्राम, पोलिस कॉन्स्टेबल ३०. अतुल भगवान मडावी पोलीस कॉन्स्टेबल ३१. विश्वनाथ लक्ष्मण मडावी पोलीस कॉन्स्टेबल

विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक



१. श्री महेश उदाजी पाटील, अतिरिक्त आयुक्त, महाराष्ट्र २. श्री बाळकृष्ण मोतीराम यादव, पोलीस उपायुक्त, महाराष्ट्र ३. श्री सायरस बोमन इराणी, सहाय्यक पोलीस आयुक्त, महाराष्ट्र ४. श्री विठ्ठल खंडुजी कुबडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, महाराष्ट्र

सुधारात्मक सेवा

१. श्री विजय बाबाजी परब, सुभेदार २. श्री राजू विठ्ठलराव हेटे, हवालदार

उत्कृष्ट सेवेसाठी पदक (एम एसएम) १. श्री राजीव वीरेंद्र कुमार जैन, पोलीस महानिरीक्षक २. श्री सुधीर कल्लया हिरेमठ, पोलीस म हानिरीक्षक ३. श्रीमती शीला दिनकर साहिल, पोलीस अधीक्षक ४. श्री मोहन मुरलीधर दहीकर, पोलीस अधीक्षक ५. श्री पुरुषोतम नारायण कराड, पोलीस अधीक्षक ६. श्रीमती. किरण जितेंद्रसिंह पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक ७. श्रीमती. नीलम प्रशांत वाव्हळ, पोलीस उपअधीक्षक ८. श्री अविनाश शंकरराव शिळीम कर, निरीक्षक (पीए) ९. श्री गजानन रामराव शेळके, पोलीस उपअधीक्षक १०. श्री महेश रमेश तावडे, सहाय्यक पोलीस आयुक्त ११. श्री विजय मार- ोतीराव माहुलकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक १२. श्री समीर नारायण साळुंके, सहाय्यक पोलीस आयुक्त १३. श्री पराग बापूराव पोटे, पो- लीस उपअधीक्षक १४. श्री दयानंद सदाशिव गावडे, पोलीस उपअधीक्षक १५. श्रीमती. पुष्पलता राजाराम दिघे, पोलीस उपअधीक्षक, १६. श्री सुनील शंकर शिंदे, निरीक्षक (झक) १७. श्रीमती. सुवर्णा उमेश शिंदे, निरीक्षक (पीए) १८. श्री अनंत ज्ञानेश्वर माळी, पोलीस उपअधीक्षक १९. श्री महेंद्र दत्तात्रय कोरे, निरीक्षक/आरओ/आरएम २०. श्री कैलाश रामजी बाराभाई, निरीक्षक/आरओ/आरएम २१. श्री विजय गोपाळ मोहिते, उपनिरीक्षक २२. श्री भारत रावसाहेब सावंत, इन्स्पेक्टर/एआरएमआर २३. श्री नरेंद्र सखाराम राऊत, सहाय्यक उपनिरीक्षक २४. श्री सतीश जनार्दन निंबाळकर, उपनिरीक्षक २५. श्री अफजल खान शहेजादे खान पठाण, सहाय्यक उपनिरीक्षक २६.श्री प्रदिप साहेबराव सावंत, सहाय्यक उपनिरीक्षक २७. श्री सुभाष वामन साळवी, उपनिरीक्षक २८. श्री प्रमोद रोहिदास वाघमारे, निरीक्षक (पीए) २९. श्री विजयकुमार शंकर शिंदे, उपनिरीक्षक ३०. श्री विक्रम व्यंकटराव नवरखेडे, उपनिरीक्षक ३१. श्री विजय प्रभाकर देवरे, उपनिरीक्षक् ३२. श्री मनोज यशवंत गुजर, उपनिरीक्षक ३३. श्री अजय मनोहर सावंत, उपनिरीक्षक ३४. श्री गंगाधर रामचंद्र घुमरे, उपनिरीक्षक ३५. श्री संजय एकनाथ शेलार, उपनिरीक्षक ३६. श्री महादेव मधुकर खंडारे, निरीक्षक/एआरएम आर ३७. श्री राजकुमार चनवीरप्पा टोळनुरे, उपनिरीक्षक ३८. श्री बाबासाहेब नाथा ढाकणे, उपनिरीक्षक ३९. श्री शिवदास दत्तात्रय फुटाणे, उपनिरीक्षक ४०. श्री सुरेश साहेबराव सोनवणे, उपनिरीक्षक

अग्निशमन सेवा

१. श्री हरिश्चंद्र वसंत गिरकर, उप. मुख्य अग्निशमन अधिकारी, २. श्री दामोदर वनगड, अग्निशमन अधिकारी ३. श्री कांचन बंडू पाटील, ड्रायव्हर ऑपरेटर ४. श्री काशिनाथ राजनाथ मिश्रा, अग्रगण्य फायरमन

नागरी संरक्षण व होमगार्ड

१. श्री गंगाधर वखाजी वुरकुड, प्लाटून कमांडर २. श्री राजेंद्र म धुकरराव बन्सोड, प्लाटून कमांडर ३. श्री नागेश्वरराव अल्कोंदिया पोडदाली, प्लाटून कमांडर

सुधारात्मक सेवा

१. श्री अशोक शिवराम करकर, अधीक्षक २. श्री गोविंद केशव राठोड, अतिरिक्त अधीक्षक ३. श्री राजेंद्र भाऊसाहेब धनगर, हवालदार ४. श्री सुनील भाऊसो लांडे, हव- ालदार ५. श्री प्रल्हाद महिपती शिंदे, हवालदार

**मंगळवारी अंक नाही**

आज सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त दैनिक यश सिद्धी न्यूज कार्यालयास सुटी असल्या कारणाने उद्या मंगळवार, २७ जानेवारी २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

- संपादक

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### शेतकऱ्यांना दिलासा

महाराष्ट्रातील तूर उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्यातील ३.३७ लाख मेट्रिक टन तूर खरेदीला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. नवी दिल्ली येथे पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे 'किंमत समर्थन योजने'अंतर्गत सुमारे २,६९६ कोटी रुपयांच्या निधीतून ही तूर खरेदी केली जाणार असून, याचा थेट लाभ राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मिळणार आहे. या बैठकीस महाराष्ट्राचे पणन मंत्री जयकुमार रावल आणि केंद्रीय कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे. तूर खरेदीच्या या निर्णयामुळे केंद्रावर मोठा आर्थिक भार पडणार असला, तरी शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळणे ही सरकारची प्राथमिकता आहे. ही खरेदी प्रक्रिया नेफेड आणि एनसीसीएफ या संस्थांच्या माध्यमातून राज्य शासनाच्या समन्वयाने राबवली जाईल. खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचनाही मंत्र्यांनी यावेळी दिल्या. शेतकऱ्यांची नोंदणी करताना कोणतीही अडचण येऊ नये आणि बिचौलियांचा हस्तक्षेप पूर्णपणे थांबवावा, असे निर्देशही त्यांनी दिले. तसेच, शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या वाढवण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

### कॅप्टन शुभांशू शुक्ला यांना अशोक चक्र जाहीर

(पान १ वरून...) विमानांच्या २,००० तासांच्या उड्डाणाचं रेकॉर्ड आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सैन्य दलातील ७० जवानांना शौर्य पुरस्कार देण्यास मान्यता दिली आहे. ज्यामध्ये सहा जणांना मरणोत्तर शौर्य पुरस्कार मिळेल. एक अशोक चक्र, तीन कीर्ती चक्र, १३ शौर्य पुरस्कार (एक मरणोत्तर) पुरस्कारांचा समावेश आहे. ४४ शौर्य पुरस्कारांचा समावेश आहे. कीर्ति चक्र पुरस्कार मेजर अर्शदीप सिंग, नायब सुभेदार डोलेश्वर सुब्बा आणि ग्रुप कॅप्टन प्रशांत बालकृष्णन नायर यांना मिळाला आहे.

२०२६ साठी पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. देशभरातून ५ जणांना पद्मविभूषण, १३ जणांना पद्मभूषण आणि ११३ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील त्या मान्यवरांचं प्राविण्य आणि सेवेसंदर्भात पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

# प्रजासत्ताक दिन : केवळ सोहळा नव्हे, तर जबाबदारीची आठवण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

२६ जानेवारी हा दिवस भारताच्या इतिहासात केवळ एका तारखेपुरता मर्यादित नाही. तो दिवस आहे भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा, संविधानाच्या सर्वोच्चतेचा आणि नागरिकांच्या सार्वभौमत्वाचा. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले आणि हजारो वर्षांच्या विषमतेच्या, अन्यायाच्या आणि गुलामगिरीच्या इतिहासाला वैचारिक छेद दिला. त्यामुळे प्रजासत्ताक दिन हा केवळ ध्वजारोहण, संचलन किंवा भाषणांचा सोहळा नसून, तो स्वतःला प्रश्न विचारण्याचा, आत्मपरीक्षणाचा आणि संविधानाशी नवी बांधिलकी जाहीर करण्याचा दिवस आहे. आज अमृतमहोत्सवोत्तर भारतात प्रजासत्ताक दिन साजरा करताना एक मूलभूत प्रश्न सतत डोकावतो की, आपण खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक आहोत का? प्रजासत्ताक म्हणजे सत्ता राजाच्या, धर्माच्या किंवा एखाद्या विशिष्ट वर्गाच्या हातात नसून संपूर्ण जनतेच्या हातात असणे. भारतीय राज्यघटनेने थश, ींहश झशेश्रिश्रशेष खपवळर या शब्दांनी सुरुवात करून ही भूमिका स्पष्ट केली. भारतात राजा नाही, धर्माधारित राज्य नाही; आहे ते फक्त संविधानाधिष्ठित लोकशाही राज्य. मात्र केवळ घटना स्वीकारल्याने प्रजासत्ताक साकारत नाही. ते जिवंत राहते ते न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार स्तंभांवर.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट इशारा दिला होता की, राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित करावी लागेल. अन्यथा संविधान कागदावर राहील, वास्तवात नाही. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. पण त्याचे महत्त्व त्याच्या जाडीमुळे




नाही, तर त्यात सामावलेल्या मानवी मूल्यांमुळे आहे. संविधानाने देशातील शेवटच्या माणसालाही हक्क दिले; आवाज नसलेल्यांना आवाज दिला; आणि सत्ता सत्ताधाऱ्यांच्या हातून काढून जनतेकडे दिली. मात्र आजच्या काळात संविधानाचा उल्लेख अनेकदा औपचारिकतेपुरता मर्यादित राहतो. संविधानावर प्रेम दाखवले जाते, पण त्याची आत्मा समजून घेण्याची तयारी कमी दिसते. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी संविधानाची शपथ घेतली जाते; पण वर्षभरात त्या शपथेचा विसर पडतो.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

प्रजासत्ताक दिनी भव्य संचलन होते, शौर्य, शिस्त आणि विविधतेचे दर्शन घडते. भारताची लष्करी ताकद, सांस्कृतिक वैविध्य आणि वैज्ञानिक प्रगती याचे चित्रण केले जाते. हे सारे अभिमानास्पद आहे. पण त्याचवेळी, देशातील शेतकरी कर्जबाजारी आहेत, तरुण बेरोजगार आहेत, स्त्रिया असुरक्षित आहेत, दलित-आदिवासी अजूनही अन्याय सहन करत आहेत, आणि संविधानाने दिलेले मूलभूत हक्क अनेकदा कागदावरच राहतात. या विरोधाभासांवर प्रजासत्ताक दिनीही मोकळेपणाने चर्चा व्हायला हवी. कारण साजरीकरण आणि सत्य यामध्ये वाढत जाणारी दरी लोकशाहीसाठी धोक्याची ठरते. आज नागरिक म्हणून आपण हक्कांबाबत जागरूक झालो आहोत, ही सकारात्मक बाब आहे. मात्र त्याच वेळी संविधानातील कर्तव्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, विविधतेचा आदर करणे, ही सगळी लोकशाहीची मूलभूत पायाभरणी आहे. प्रजासत्ताक म्हणजे सरकारवर टीका करण्याचा अधिकार; पण तो अधिकार जबाबदारीने वापरण्याची नैतिकताही तितकीच महत्त्वाची आहे. अन्यथा स्वातंत्र्य अराजकतेत बदलण्याची भीती असते.

प्रजासत्ताक दिनाच्या ७५ वर्षांनंतरही जातीभेद, आर्थिक विषमता आणि लैंगिक अन्याय संपलेले नाहीत. संविधानाने समतेची हमी दिली, पण समाजमन अजूनही पूर्णपणे बदललेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत सांगितले होते की, भारतात भक्तीची भावना राजकारणात आली, तर लोकशाही धोक्यात येईल. आज व्यक्तीपूजा, अंधनिष्ठा आणि द्वेषाचे राजकारण वाढताना दिसत असेल, तर तो प्रजासत्ताक मूल्यांसाठी गंभीर इशारा आहे. भारताचे प्रजासत्ताक हे धर्मनिरपेक्ष आहे. याचा अर्थ धर्मविरोधी नव्हे, तर सर्व धर्मांना समान वागणूक देणारे राज्य. पण अलीकडच्या काळात धर्माच्या नावावर समाजात ध्रुवीकरण वाढत असल्याचे चित्र आहे. प्रजासत्ताक दिन हा धर्म, जात, भाषा यांपलीकडे जाऊन भारतीय नागरिक म्हणून आपली ओळख पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस असायला हवा. अन्यथा प्रजासत्ताकाची संकल्पना हळूहळू कोसळण्याचा धोका नाकारता येत नाही.


भारताची लोकसंख्या तरुण आहे. ही तरुणाई प्रजासत्ताकाची सर्वात मोठी ताकद आहे. मात्र ती केवळ घोषणांमध्ये गुंतून न राहता, प्रश्न विचारणारी, चिकित्सक आणि जबाबदार बनली तरच लोकशाही मजबूत होईल. संविधान समजून घेणारी तरुण पिढीच प्रजासत्ताकाचे भवितव्य सुरक्षित ठेवू शकते. केवळ सोशल मीडियावरील देशभक्ती पुरेशी नाही; लोकशाहीचे भान आणि विवेक अधिक गरजेचा आहे. प्रजासत्ताक दिन हा वर्षातून एकदा साजरा करण्याचा कार्यक्रम नाही. तो दररोज जगायचा मूल्यांचा उत्सव आहे. संविधानाचे पालन, अन्यायाविरुद्ध उभे राहणे, दुर्बलांचा आवाज बनणे, हीच खरी प्रजासत्ताक दिनाची भावना आहे. आज गरज आहे ती ध्वजाला सलाम करताना संविधानालाही मनापासून स्वीकारण्याची. संचलन पाहताना समाजातील शेवटच्या माणसाची अवस्था लक्षात ठेवण्याची आणि अभिमानाबरोबर आत्मपरीक्षण करण्याची. कारण भारत प्रजासत्ताक आहे, फक्त घटनात्मकदृष्ट्या नव्हे, तर मूल्यात्मकदृष्ट्याही आणि ही जबाबदारी आपली सगळ्यांची आहे.

या प्रजासत्ताक दिनी आपण केवळ ध्वजाला वंदन न करता संविधानाच्या मूल्यांनाही मनापासून स्वीकारू या. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही चार तत्त्वे फक्त शब्दांत नव्हे, तर आपल्या आचरणात, विचारात आणि निर्णयांत उतरवू या. प्रत्येक नागरिक जागरूक असेल, प्रत्येक आवाजाला सन्मान मिळेल आणि संविधान सर्वोच्च राहील, असाच समताधिष्ठित, विवेकी आणि मजबूत भारत घडवण्याचा संकल्प करू या. सर्वांना ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

# प्रजासत्ताक, प्रजेची सत्ता आणि सत्य..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आपण सत्तेहत्तरावा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. प्रजासत्ताक दिन जरी आपण दरवर्षी साजरा करत असलो तरीही अजूनही देशातील नव्वद टक्के पेक्षा जास्त लोकांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, पार्श्वभूमी, आणि गांभीर्यच नाही. हि केवळ शोकांतिका नाही तर आपण स्वतःला कितीही हुशार, बुद्धिमान व सुशिक्षित समजत असलो तरीही प्रजासत्ताक दिन, संविधान आणि देश याबाबत आपली अक्कल, आपले विचार शुन्य असुन आपला मेंदू विकसित झाला नसल्याचे हे प्रमाण आहे. स्वतःला सुशिक्षित, विद्वान समजणाऱ्यांना जर संविधान, प्रजासत्ताक आणि देश हे जर समजत नसेल, याबाबत जागृती नसेल तर ती विद्वत्ता आणि ते शिक्षण कोणत्याही कामाचे नसुन तो असणारा केवळ बौद्धिक मतीमंद व्यक्ती होय. बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिवस म्हणजे सुट्टीचा दिवस वाटतो तर बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिन म्हणजे झेंडा दिवस वाटतो. शाळेत किंवा जिथे कुठे प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो त्या ठिकाणी प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ, प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व व त्याचे फायदे यावर कधीच सखोल आणि निष्पक्ष चर्चा वा प्रबोधन झालेच नाही. स्वतःला सुशिक्षित व विद्वान समजणाऱ्या लोकांना जर प्रजासत्ताक दिनाचा अर्थ व महत्त्व कळत नसेल तर आपले शिक्षण व विद्वत्ता कोणत्या गुणवत्तेची आहे हे तपासणे आवश्यक आहे. स्वंयघोषित सुशिक्षित व विद्वान हा उल्लेख वारंवार यासाठी करावा लागत आहे की याच लोकांची बौद्धिक पातळी अशी असेल तर गाव खेड्यातील अडाणी आणि कष्टकरी जनतेला प्रजासत्ताक दिन व त्याचे गांभीर्य कसे कळेल? त्यांना प्रजासत्ताक चा खरा अर्थ कोण सांगणार? प्रजासत्ताक देशामध्ये अडाणी, कष्टकरी गाव खेड्यात राहणाऱ्या लोकांचे काय स्थान आहे? प्रजासत्ताक व्यवस्थेचा खरचं तळागाळातील लोकांना फायदा झाला का? असे अनेक प्रश्न आहेत ज्यावर चर्चा, संमेलन व जागृती होणे गरजेचे आहे. केवळ शहीदांचे गाणे लाऊन देशभक्तीचा देखावा करता येत नाही. जिवाची बाजी लावून ब्रिटीशांच्या तावडीतून देशाला स्वातंत्र्य करताना जे जवान शहिद झाले, ज्यांनी आपले आयुष्य भारतीयांना हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी, देशाचा विकास होण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य केले त्यांचे स्मरण करण्याचा दिवस अर्थात पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करतो. परंतु प्रजासत्ताक दिनी शहिदांचे गाणे लाऊन लोकांना भावनिक करून मुळ मुद्यावरून लक्ष विचलित करून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व लोकांना कळूच नये अशी रितसर व्यवस्था केली जाते. प्रजासत्ताक दिनी चर्चा व्हायला पाहिजे ती संविधानावर, संविधान निर्माण करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर. पण आजही संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही घेण्याचे धाडस येथील विकृत व बौद्धिक कमकुवत लोकांकडून होत नाही. याचे कारण ते कितीही शिकलेले असतील तरीही त्यांच्या मेंदुचा विकासच झालेला नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संविधान हे देशाचे आहे. संविधानावर देश चालतो, संविधान निर्माण झाले म्हणून प्रजासत्ताक दिन आपण साजरा करतो. देशाचे सर्वोच्च असलेले संविधान आजही काही लोक विशिष्ट लोकांचे संविधान आहे असे समजून संविधान वाचत नाहीत, घरात आणत नाहीत म्हणजे किती ही बौद्धिक दिवाळखोरी आहे. संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून कित्येक लोक संविधान घरात आणत नाहीत अशा मानसिकतेच्या लोकांना कसे विद्वान म्हणता येईल. मोठमोठ्या महाविद्यालयात शिकून, अंगावर पांढरे कपडे घालून आणि लाखात पगार घेणे म्हणजे हुशार किंवा सुशिक्षित आहे असे मुळीच नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे बौद्धांचे आहेत म्हणून संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर नाकारणारे लोक बौद्धिक दरिद्री तर आहेतच पण देशद्रोही आणि धर्मद्रोही सुद्धां आहेत. कारण संविधान हे देशाचे आहे. आणि भारतीय माणसाने भारतचे संविधान लिहले. आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा संविधान लिहले तेव्हा ते हिंदूच होते. जगातील सर्वात मोठा विद्वान तत्कालीन हिंदू,






विनोद पंजाबराव सदावर्ते
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)

जगातील सर्वोच्च संविधान ही बाब हिंदू धर्मीयांसाठी धर्माचा व्यक्ती म्हणून आणि जगात सर्वात सुंदर संविधान लिहले म्हणून देशाचे नागरिक म्हणून संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करणे किती गौरवाची बाब आहे. पण हे ज्यालाच कळेल जो खरा धर्माचा आणि खरा देशाचा आहे. बरेच लोक म्हणतात संविधान बदलायला पाहिजे. का बदलायला पाहिजे तर केवळ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले, त्यातील बराचसा भाग इतर देशाकडून घेतलेला आहे वगैरे वगैरे बोलुन स्वतः ची अक्कल पाजळत बसतात. पण ते हे करतांना आपल्याच धर्मातील तत्कालीन विद्वान आणि हुशार दोनशे चौऱ्यांशी लोकांनी संविधान देशाच्या वतीने स्विकृत केले म्हणजे आजचे स्वयंघोषित विद्वान त्या दोनशे चौऱ्यांशी लोकांच्या देशभक्ती वर व विद्वतेवर प्रश्नच निर्माण करत नाहीत तर त्यांची विद्वत्ता झुगारून लावतात. त्या स्वधर्मीय लोकांपेक्षा आजचे स्वयंघोषित लोक जास्त हुशार झाले का? दोनशे चौऱ्याशी लोकांच्या सह्या झाल्या तेव्हा कुठे डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधानाचे शिल्पकार ठरले. आणि याच संविधानाने अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक माणसाला माणसात आणले, गरीब, श्रीमंत, स्त्री पुरुष किंवा जाती धर्म याचा विचार न करता केवळ व्यक्ती म्हणून मान सन्मान आणि संधी निर्माण करून करू दिली. देशाच्या संपत्तीत प्रत्येकाला समान हिस्सा दिला. झोपडीतील, शेतीतील, महालातील, श्रीमंत माणसाला एकच महत्त्व दिले आणि सर्वांना देश चालवण्याचा अधिकार दिला. ते दिले म्हणून चौकटीत च्या आत असणाऱ्या महिला विमानात फिरतात, चुल आणि मुलच सांभाळणाऱ्या महिला आज जिल्हा देश सांभाळत आहेत, महिलांनी पुरुषांच्या समोर उभेही राहू नये असे असताना आज पुरूषांच्या समोर स्त्रिया जात आहेत, चहा विकणारा देश चालवत आहे हे केवळ आणि केवळ भारतीय संविधानाने मुळ शक्य झाले. जनतेच्या हातात सत्ता संविधानाने दिली. याचा अर्थ कोणत्याही प्रकारचा भेद न करता कोणताही योग्य व्यक्ती जो मतदार आहे देशाच्या कोणत्याही भागात देशाचा कारभार करणयासाठी निवडणूकीच्या माध्यमातून किंवा नोकरीच्या माध्यमातून जाऊ शकतो तिथे गरीब श्रीमंत स्त्रि पुरुष किंवा जात धर्माचा कोणताही भेद केला जात नाही. यालाच जनतेची सत्ता म्हणतात. जनतेच्या हितासाठी जनतेनेच आपला कारभार करून आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगती करून घेणे म्हणजे प्रजासत्ताक आहे. प्रजासत्ताक देशात संविधानाने बोलण्याचा, अभिव्यक्त होण्याचा, व्यवसाय करण्याचा, शिक्षणाचा, सार्वजनिक मालमत्तेचा व नैसर्गिक साधन संपत्तीचा उपभोग घेण्याचा अधिकार दिला पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा अधिकार नाकारला कोणी यावरही चर्चा होणे आवश्यक आहे. महिलांवर बंधने घालून त्यांना गुलाम करून शिक्षण व विकासापासून कोणी दुर केले होते? मुलींनी घराबाहेर पडू नये, मुली शिकल्या म्हणजे धर्म बुडतो असे माणल्या जाणाऱ्या समाजातील स्त्रियांना पुरुषां प्रमाणे मानसन्मान, शिक्षण, नोकरी आणि पगार देऊन सामाजिक व आर्थिक उन्नती करणारे संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल किती महिला प्रामाणिक आहेत. अंगावर महागडी साडी, चेहऱ्यावर फांऊडेशन, हे फक्त संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार आहेत. कोणत्याही धर्माने महिलांना एवढे हक्क अधिकार तर सोडा पण महिलेला माणूस म्हणून सुद्धां सन्मान दिला नाही ते महान काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून केले. गरिबातील गरीब व्यक्तीही शिक्षण घेऊ शकतो, निवडणूक लढू शकतो आणि देश चालवू शकतो हे संविधानाने दिलेले अधिकारी असले तरीही सत्य काय आहे यावर विचार केला तर शिक्षण आणि निवडणूक धनदांडग्या लोकांच्या हाती गेले. निवडणूक व्यक्तीचे काम नाही तर पैसा बघून लढवली जाते. प्रजेची सत्ता असताना प्रजेला एवढे भिकारी बनवले कि प्रजा निवडणुकीत हजार पाचशे घेऊन कोणालाही मत देते ही व्यवस्था निर्माण केली गेली. हजार पाचशे एका मतासाठी देणारा निवडून आला कि किती कमवत असेल याची कल्पना सर्वसामान्य मानसाला नसणारच आहे. संविधानाने अभिव्यक्त होण्याचा अधिकार दिला असला तरीही येथे जनतेचा आवाज दाबला जातो, जनतेच्या समस्या लक्षात घेतल्या जात नाहीत, अडाणी, पाखंडी लोक राजकारणात जाऊन धर्माच्या आडून चुकिचा इतिहास, चुकिचा धर्म सांगुन लोकांना बौद्धिक गुलाम व भक्त बनवत आहेत. जनतेचा आवाज कोणीच ऐकायला तयार नाही. मिडिया निवडणूक आयोग, विरोधी पक्ष आणि धर्माचे लोक सत्तेचे गुलाम झाल्याने जनतेच्या समस्या वाढत आहेत आणि जे सत्तजसोबत हात मिळवणी करत आहेत त्यांची भरभराट होत आहे. प्रजासत्ताक मध्ये सत्ता जनतेच्या हाती असण्याचे एकमेव शस्त्र म्हणजे मताधिकार हा मताधिकार इव्हिएम च्या माध्यमातून काढून घेतला आहे. जनता विरोधात, कार्यकर्ते विरोधात, नेते विरोधात असतानाही जर तेच लोक निवडून येत असतील तर त्यांना लोकांच्या मताची नाही तर यंत्राची गरची आहे. म्हणून लोक पेपर वर निवडणुक व्हायला पाहिजे म्हणत असताना ही यंत्रावर होत आहेत. याचाच अर्थ प्रजेची सत्ता येण्या आधीच प्रजेला सत्तेपासून कोसो दुर नेले जात आहे आणि हेच सत्य आहे. लोकशाही मध्ये सत्य बोलणे गुन्हा आणि भ्रष्टाचार, व्यभिचार, धार्मिक कट्टरता पाळणे संस्कार झाले आहेत. देश अधोगतीला जात असताना देशातील मुठभर नेते मात्र देशातील माया जमवत आहेत हे लोकशाहीला मारक आहे. खरी लोकशाही, खरा प्रजासत्ताक दिन यावर चर्चा प्रबोधन होत नाही आणि एक भारतीय भारताच्या विकासाचा ग्रंथ वाचत नाही तो देश कशाच्या आधारावर प्रगती करेल? जगाला लाजवेल असे संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण करून वेगवेगळ्या जातीधर्माला, वेगवेगळ्या बोलीभाषेला, वेगवेगळ्या खानपान असलेल्या, वेगवेगळी वेशभूषा असलेल्या आणि वेगवेगळी नावे असलेल्या लोकांना एकच ओळख भारतीय म्हणून देऊन समान हक्क अधिकार बहाल केले आणि ते जनतेला लागु झाले तो हाच दिवस २६ जानेवारी. प्रजासत्ताक दिनांचा विजय असो. भारताचे संविधान आणि संविधानाचे निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन.

प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय सदिच्छा

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble


■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास आकर्षक फुलांची सजावट

## संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात तिरंगा ध्वजाच्या रंगसंगतीत आकर्षक व नयनरम्य फुलांची सजावट करण्यात आली आहे, अशी माहिती प्र. व्यवस्थापक संदेश भोसले यांनी दिली.

यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील श्रींचा गाभारा, चौखांबी, सोळाखांबी तसेच श्री संत नामदेव पायरी या ठिकाणी शेवंती, जरबेरा, झेंडू, गुलाब, ऑर्किड, ब्लू डेजी, कामिनी आदी सुमारे दोन टन फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. महत्त्वाचे सण-उत्सव व राष्ट्रीय महत्त्वाच्या विशेष दिनांच्या निमित्ताने मंदिरात नेहमीच देखणी फुलांची आरास करण्यात येते.

सदरची फुलांची सजावट पुणे येथील विठ्ठल भक्त सचिन चव्हाण, इंद्रजीत दळवी व संदीप पोकळे यांनी सेवाभावी वृत्तीने मोफत स्वरूपात करून दिली आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त करण्यात आलेली विद्युत रोषणाई व फुलांची सजावट पाहण्यासाठी दर्शन रांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. दर्शनरांगेत पुंडलिक वरदे हरी विठ्ठल या जयघोषासोबतच भारत माता की जय अशा घोषणा भक्तांकडून दिल्या जात असून संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला आहे.

---

# कलयुगात संतांचे भेटणे दुर्मिळ आहे; ग्रंथ वाचनातून आपणास संत भेटतात : शि.भ.प. उमाशंकर मिटकरी महाराज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब : दि.२५(प्रतिनिधी) कलयुगात संतांची भेट दुर्मिळ आहे संतांनी आपल्या सेवा ,भक्ती साधनेतून ग्रंथरुपी विचार अमृत निर्माण केले आहेत. यासाठी ग्रंथाचे वाचन व पारायण करावे व विचारावर चालावे, यातून आपणास आत्मिक समाधान व कौटुंबिक स्थैर्य, विकास होईल असे विचार कीर्तनकार शि.भ.प. उमाशंकर मिटकरी महाराज चुंबळीकर यांनी कळंब येथे श्री. संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज जन्मभूमी तीर्थक्षेत्र मंदिर देवस्थान कळंब येथे अखंड शिवनाम सप्ताहात दि. २१ जानेवारी २०२६ रोजी शिवनाम किर्तन सेवा सादर करीत असताना व्यक्त केले. त्यांनी याप्रसंगी आज भाग्य उदया आले ! संत पाऊल देखीले !! संत जीवन स्वामी यांच्या अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. कळंब ही संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांची जन्मभूमी आहे. गतवर्षी मंदिरास तीर्थस्थळाचा दर्जा मिळाला असून भव्य मंदिर निर्माण कार्य झाले आहे. अखंड शिवनाम सप्ताहाचे हे ३० वे वर्ष असून १६ जानेवारी पासून सकाळी ६ते ७ शिवलिंगास अभिषेक, ८ ते १० मन्मथ स्वामी यांच्या परमरहस्य ग्रंथाचे पारायण सुरू असून शि.भ.प.राजाभाऊ महाराज खडबड ,रामवडगावकर हे पारायण प्रमुख आहेत. शि.भ.प. सरस्वती ताई स्वामी अंबाजोगाई यांची प्रवचन सेवा, रात्री ७ ते ९ या वेळात किर्तन सेवा संपन्न होत आहे. वरील सर्व कार्यक्रम संत मन्मथ स्वामी सेवा भावी संस्था पंच कमेटी मार्गदर्शक राजाभाऊ (आबा) मुंडे, अध्यक्ष नगरसेवक सागर मुंडे व पंच कमिटी मुख्य पुजारी शैलेश स्वामी यांच्या नियोजनात सुरू असुन दि.१६ जानेवारी२०२६ रोजी अखंड शिवनाम सप्ताहाची सुरुवात झाली असून दि.२४ जानेवारी २०२६ रोजी सप्ताहाची सांगता झाली आहे. या निमित्त कळंब शहरातून भव्य शोभायात्रा, पालखी मिरवणूक व महाप्रसाद आदी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला आहे. या कार्यक्रमासाठी शहरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

# पंढरपूर तालुका तपकिरी शेटफळ गावचा राज्यसेवा परीक्षेत महाराष्ट्रात डंका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातून तपकिरी शेटफळ गावचे एकाच महिन्यात तीन ऑफिसर राज्यसेवा परीक्षा देऊन झाले असून त्यामध्ये किरण किसन महापुरे यांची महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षा २०२४ मध्ये सहाय्यक संचालक वित्त व लेखा (क्लास वन) उऋज/चऋड(महाराष्ट्र शासन) पदी नियुक्ती झाली तसेच प्रशांत चिंतामणी पळसे व नवनाथ रामचंद्र मासाळ यांची भारतीय सैन्य दलात नुकतीच निवड झाली असून त्याबद्दल तपकिरी शेटफळ ग्रामस्थांच्या वतीने तिन्ही अधिकाऱ्यांचे यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला आहे.

याप्रसंगी किरण महापुरे यांनी तरुण युवक पिढीला प्रत्येक गोरगरीब व होतकर विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करण्यासाठी वाचनालयाची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच चिंतामणी पळशी यांनी जे नवनियुक्त आज भारतीय सैन्य दलात जाण्यासाठी प्रयत्न करत आहेत त्यांच्यासाठी खंबीरपणे त्यांच्या पाठीमागे उभे राहण्याची आश्वासन दिले आहे.

---

# राष्ट्रीय प्रतिज्ञेचे जनक ‘पेदेमरी व्यंकट सुब्बाराव’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आपली ''प्रतिज्ञा'' ही भारताविषयी कृतज्ञता दर्शवते, भारत माझा देश आहे ही भावना देशातील प्रत्येक नागरिकाने आत्मीयतेने म्हटली पाहिजे व देशाबद्दल असलेले प्रेम जपले पाहिजे. गांभीर्यपूर्ण शपथ, वचन किंवा दृढ निश्चय आपल्या राष्ट्रीय प्रतिज्ञेमधून दिसून येतो. आपल्या देशासाठी चांगले काम करण्याचा संकल्प आणि देशभक्तीची भावना सुदृढ व्हावी, यासाठी घेतलेला आधार म्हणजे आपली राष्ट्रीय प्रतिज्ञा .विवेकवादी, समतावादी, एकात्म समाज घडविण्याचा संकल्प प्रतिज्ञे मध्ये दर्शवितात.

आपण सर्वजण शाळेत मोठ्या,मोठ्या आवाजात प्रतिज्ञा म्हणायचो आणि आजही अभिमानाने म्हणत आहोत 'भारत माझा देश आहे' ही आपली ''राष्ट्रीय प्रतिज्ञा शालेय पाठ्यपुस्तकात पहिल्या पानावरच नमूद असलेली प्रतिज्ञा ज्यांच्या लेखणीतून साकार झाली ते आंध्र प्रदेश मधील सुप्रसिद्ध तेलगू साहित्यिक म्हणजे पेदेमरी व्यंकट सुब्बाराव....


खरंतर आजही अनेकांना माहिती नसेल की, आपली राष्ट्रीय प्रतिज्ञा कोणी लिहिली. खरतर लेखक नरेंद्र लांजेवार यांच्या लेखणी मधून आपल्या सर्वांना राष्ट्रीय प्रतिज्ञेचे लेखक कोण आहेत हे समजले आहेत. महत्त्वाचे संशोधन 'वयम्' मासिकासाठी खास लिहून राष्ट्रीय प्रतिज्ञेच्या मूळ लेखकाची ओळख प्रथम लेखक नरेंद्र लांजेवार लेख लिहून आपली प्रतिज्ञा कोणी लिहिली? याचा उलगडा सविस्तर लेख मधून केलेला आहे आणि या लेखचा परिपूर्ण फायदा आणि सविस्तर महत्वाची माहिती नागरिकांना आज मिळत आहे. प्रतिज्ञेची माहिती ज्यांनी शोधून काढली ते लेखक नरेंद्र लांजेवार यांचं २०२२ मध्ये वयाच्या ५३ व्या वर्षी दुर्दैवी निधन झालं आहे. त्यावेळी नरेंद्र लांजेवार यांनी प्रतिज्ञेवर लिहिलेला लेख शाळाशाळांमध्ये वाचला गेला व फलकावर लावला गेला होता. २६ जानेवारी २०१२ मध्ये पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांच्या मित्रपरिवाराने प्रतिज्ञेचा सुवर्ण महोत्सव साजरा केला होता तो आजचा दिवस सर्वांसाठी महत्त्वाचा दिवस ठरला आहे. याच दिवसा मुळे इतिहासाचे पाने पुन्हा रंगून गेली आहेत आणि इतिहासात ज्यांचं नाव प्रतिज्ञे सोबत जोडले आहे ते म्हणजे पेदेमरी व्यंकट सुब्बाराव

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले भारतीय संविधान २६ जानेवारी १९५० रोजी लागू करण्यात आले. त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस भारतीय 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा केला जातो. २६ जानेवारी १९६५ पासून ही प्रतिज्ञा संपूर्ण देशात लागू करण्यात आली. म्हणजेच राष्ट्रीय प्रतिज्ञेचा ६४ वा वर्धापन दिन असे दोन्ही दिवस आज महत्त्वाचे ठरत आहेत.

भारत माझा देश आहे या वाक्यात देशा बद्दलची आत्मियता दिसून येते. सारे भारतीय माझे बांधव आहेत हे वाक्य भारतीय संविधानाची आठवण करून देत आहे. माझ्या देशावर माझे प्रेम आहे या वाक्यातून देशातील प्रत्येक नागरिकांने आपल्या देशाबद्दलचा आदर प्रेम राखून ठेवणे दिसून येते. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरेचा मला अभिमान आहे. जो भारत देश

विविधतेने नटलेला आहे . ती भारताची सुंदरता आम्हाला सर्वांना सांभाळून ठेवायची आहे असे या ओळीतून म्हटले आहे. अशा अनेक बाबींचा उलगडा प्रतिज्ञेमधून दिसून येतो आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे.

आंध्रप्रदेशच्या नालगोंडा जिल्ह्यातील अन्नेपर्थी या गावच्या पेदेमरी व्यंकट सुब्बारावांचे संस्कृत, तेलगू, इंग्रजी आणि अरेबिक भाषांमध्ये पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण झाले होते. शिक्षणाची आवड त्यांना होती. तर लिखाणाची आवड त्यांनी शेवट पर्यंत जिवंत ठेवली. विशाखापट्टणम्




जिल्ह्याचे अनेक वर्षं ते जिल्हा कोषागार अधिकारी म्हणून सरकारी नोकरीत होते. आपली नोकरी सांभाळून ते लिखाण करत होते. त्यांची ' कालाभरवाहू ' नावाची तेलगू कादंबरी विशेष गाजली. आणि ती कादंबरी लोकप्रिय आहे.पेदेमरी व्यंकट सुब्बाराव हे मुळात राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेले, स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतलेले कवी म्हणून ओळख त्यांची आहे. आपल्या जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी म्हणावी म्हणून एक प्रतिज्ञा १९६२ मध्ये लिहिली. त्यांच्या एका शिक्षण खात्यातील मित्राला ही कल्पना खूपच आवडली.सुब्बाराव यांचे मित्र तेन्नेटी विश्वनाथम यांनी ही प्रतिज्ञा आंध्रप्रदेशचे तत्कालीन शिक्षणमंत्री पी.व्ही. जी. राजू यांच्याकडे ही प्रतिज्ञा पाठवली. शिक्षणमंत्र्यांनी ही प्रतिज्ञा शाळांमध्ये घेण्याचा आदेश दिला. ‘डेव्हलपमेंट ऑफ एज्युकेशन इन इंडिया’ या समितीची स्थापना केलेली असते. या समितीचे अध्यक्ष केंद्रीय शिक्षणमंत्री असतात. या ‘डेव्हलपमेंट ऑफ एज्युकेशन इंडिया’ची एकतिसावी मिटिंग तत्कालीन केंद्रीय शिक्षण मंत्री एम. सी. छागला यांच्या अध्यक्षतेखाली ११ आणि १२ ऑक्टोबर १९६४ मध्ये बंगळुरू येथे झाली होती. या मिटिंगच्या वृत्तान्तामध्ये-

'शिक्षणाचा भारतातील विकास : स्वातंत्र्यपूर्व आणि पश्चात शैक्षणिक दस्तऐवजांचा ऐतिहासिक सर्वेक्षण' या पुस्तकाच्या पान १४० वर मुद्दा क्रमांक १८ मध्ये उल्लेख आढळतो की, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना सदोदित राहण्यासाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये, तसेच राष्ट्रीय दिवसांच्या शुभपर्वावर विद्यार्थ्यांसाठी एक प्रतिज्ञा असावी.याकरिता पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांनी लिहिलेली इंडिया इज माय कंट्री ऑल इंडियंस आर माय ब्रदर न्ड सिस्टर' ही प्रतिज्ञा देशपातळीवर स्वीकारण्याची शिफारस करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. ही प्रतिज्ञा १९६३ मध्ये विशाखापट्टणममधील एका शाळेत प्रथम वाचून दाखवण्यात आली असून मोठा इतिहास रचला गेला.

त्या नंतर त्याच वर्षी इतर अनेक शाळांमध्येही ते वाचून दाखवण्यात आली. म्हणजेच हळूहळू ही प्रतिज्ञा सर्वांची ओळख होऊ लागली. त्यानंतर प्रतिज्ञेचा देशपातळीवरील विविध प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले.

१९६४ मध्ये बंगळुरू येथे झालेल्या केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या बैठकीत, त्यांच्या अध्यक्ष एमसी छागला यांच्या अध्यक्षतेखाली, शाळांमध्ये ही प्रतिज्ञापत्रे वाचून दाखवण्यात यावीत आणि ही पद्धत २६ जानेवारी १९६५ पर्यंत सुरू करावी असे निर्देश देण्यात आले. १९६५ पासून देशातील सर्वच राज्यांच्या पाठ्यपुस्तकांमध्ये तिचा समावेश करण्यात आला. या प्रतिज्ञेला फक्त पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञेचा दर्जा न देता, तिला राष्ट्रीय प्रतिज्ञेचा दर्जा देशपातळीवर देण्यात आला.आज ही प्रतिज्ञा देशाचा अभिमान म्हणून सर्वांच्या मनावर राज्य करत आहे.

२६ जानेवारी २०१२ मध्ये आपल्या राष्ट्रीय प्रतिज्ञेला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या आनंदाने सुब्बारावांच्या मित्र परिवाराने प्रतिज्ञेचा सुवर्ण महोत्सव साजरा केला होता. म्हणजेच प्रतिज्ञे बद्दलचा आदर आणि सन्मान व्हावा म्हणून पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांच्या मित्र परिवाराने सामाजिक बांधिलकी आणि प्रतिज्ञेबाबत आपली जबाबदारी पार पाडली आहे असे दिसून येत असून, देशातील प्रत्येक नागरिकांने राष्ट्राची एकदा अबाधित ठेवणे गरजेचे आहे. प्रतिज्ञेचा सुवर्ण महोत्सव साजरा झाल्या बाबतची बातमी ' टाइम्स ऑफ इंडिया' आणि दैनिक' हिंदू' या इंग्रजी वृत्तपत्रांत त्याविषयीची बातमी प्रकाशित झाली. या बातमीमुळेच आजच्या पिढीतील अनेकांना आपल्या राष्ट्रीय प्रतिज्ञेचा खरे लेखक पेदेमरी व्यंकट सुब्बाराव आहेत याची ओळख झाली. जर प्रतिज्ञेचा सुवर्ण महोत्सव साजरा झालाच नसता त्याविषयी वर्तमानपत्रात बातमी छापून आलीच नसती, लेखक नरेंद्र लांजेवार यांनी संशोधन करून प्रतिज्ञे बद्दल लेख लिहलाच नसता तर आम्हाला आज पर्यंत राष्ट्रीय प्रतिज्ञेचा लेखक कोण? हे समजू शकले नसते.

आपले राष्ट्रगीत रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिले आणि राष्ट्रगान बंकिमचंद्र चटर्जी यांच्या नावे ओळखले जाते. तशीच ही राष्ट्रीय प्रतिज्ञाही पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांच्या नावाने ओळखली जात आहे. पाठ्यपुस्तकात पहिल्या पानावर असलेली ही राष्ट्रीय प्रतिज्ञा' देशा बद्दल आदर, प्रेम, निर्माण करते. सर्वांमध्ये बंधू भावाची भावना निर्माण करते. भारतीय संविधानाला अभिप्रेत असणारे मूल्ये हा आपल्या राष्ट्रीय प्रतिज्ञे मध्ये सापडतात. ज्या प्रमाणे कविता लिहिणाऱ्याच नाव असते, पाठ्यपुस्तकात ''धडा'' असतो त्याखाली लेखकाचे नाव असते त्याच प्रमाणे पुस्तकातील छापलेल्या प्रतिज्ञेखाली, ज्या लेखकाच्या लेखणीतून ही प्रतिज्ञा सारकारलेली आहे. त्याचं नाव आलेच पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थाने पेदेमरी व्यंकट सुब्बाराव यांना न्याय मिळेल. आज प्रतिज्ञेला ६४ वर्षं होऊन गेली आहेत. १३ ऑगस्ट १९८८ रोजी त्यांचे निधन झाले. निधनानंतरही, या राष्ट्रीय प्रतिज्ञेच्या माध्यमातून आजही प्रत्येक भारतीय नारीच्या, विद्यार्थ्याच्या मनात लेखक पेदेमरी व्यंकट सुब्बाराव प्रतिज्ञेच्या रूपात जिवंत आहेत .या प्रतिज्ञेचे पालन करून आदराने सन्मान करू या.


'मी प्रथम भारतीय आणि अंतिमतः भारतीय'


लेखक - मिलिंद सुरेश जाधव
रा. पडघा, भिवंडी
मो.८६५५५६९४३६

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई

## भारतीय प्रजासत्ताक दिनाचा वर्धापनदिन; सलग सुट्ट्यांमुळे दर्शनरांगेत भाविकांची मोठी गर्दी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व संपूर्ण मंदिर परिसरात आकर्षक व नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात आली असल्याची माहिती मंदिर समितीचे प्र. व्यवस्थापक संदेश भोसले यांनी दिली. या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील श्री विठ्ठल सभा मंडप, मंदिराचा आतील व बाहेरील परिसर तसेच श्री संत नामदेव पायरी येथे तिरंग्याच्या रंगसंगतीत विशेष विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. याशिवाय श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, श्री संत तुकाराम भवन, श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास, वेदांता – व्हिडिओकॉन भक्त निवास आदी ठिकाणीही आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून परिसर देशभक्तीच्या वातावरणाने उजळून निघाला आहे.

सदर रोषणाईसाठी सुमारे १०० एलईडी माळा, २५ फोकस लाईट्स तसेच १०० ट्यूब लाईट्सचा वापर करण्यात आला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व आवश्यक खबरदारी घेण्यात आली असून ही संपूर्ण रोषणाई श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमार्फत करण्यात आली आहे. या कामाची जबाबदारी विद्युत विभाग प्रमुख शंकर मदने यांच्याकडे असून यासाठी सात कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. दरम्यान, भारतीय प्रजासत्ताक दिन व सलग शासकीय सुट्ट्या आल्यामुळे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. राज्याच्या विविध भागांतून तसेच परराज्यातूनही मोठ्या संख्येने भाविक श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दाखल झाले आहेत. भाविकांना सुरक्षित, सुलभ व सुव्यवस्थित दर्शन मिळावे, यासाठी मंदिर समितीमार्फत आवश्यक व पुरेशा प्रमाणात सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामध्ये दर्शन रांगेचे नियोजनबद्ध व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छता, वैद्यकीय मदत तसेच इतर अनुषंगिक सुविधांचा समावेश आहे.

दर्शन रांग अधिक सुलभ व जलद गतीने चालवण्यासाठी व्हीआयपी दर्शनावर निर्बंध घालण्यात आले असून टोकन दर्शन सुविधा तसेच भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा बंद ठेवण्यात आल्या आहेत. यामुळे सामान्य भाविकांच्या दर्शनाला प्राधान्य देण्यात येत असून दर्शन प्रक्रिया अधिक गतिमान व सुरळीतपणे पार पडत असल्याचे यावेळी श्री भोसले यांनी सांगीतले.

# स्वेरीत 'राष्ट्रीय मतदार दिन' संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र शासन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशानुसार गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट मध्ये 'राष्ट्रीय मतदार दिना'निमित्त रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

**विद्यार्थ्यांनी घेतली लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ**

भारत देश हा युवकांचा देश असून १८ वर्षे पूर्ण झालेल्या वयोगटातील तरुण युवकांना नवचेतना देऊन राष्ट्राच्या विकासाच्या दिशेने घेऊन जाणे हा या उपक्रमाचा हेतू आहे. नवतरुणांना राष्ट्र उभारणीच्या कार्याचा एक भाग म्हणून मतदान करण्याबाबत जागृत करण्यासाठी त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे यासाठी स्वेरीमध्ये हा मतदार जनजागृतीचा उपक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ देण्यात आली. शपथेचे वाचन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले. यावेळी राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, सौ. मोहितकर, अ‍ॅड. ज्ञानेश आराध्ये, सौ. माधुरी गवंडी, स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, स्वेरीचे सचिव डॉ.सुरज रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मनियार, डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. बी.चौंडे, रासेयोचे इतर अधिकारी, स्वयंसेवक, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# महोत्सव कवितांचा आणि सन्मान सोहळ्यात प्रवीण बागडे यांचा गौरव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर, (प्रतिनिधी) : कविता म्हणजे समाजाचे आरसेपण जपणारी सर्जनशील अभिव्यक्ती. याच विचारातून कविता म्हणजे प्रबोधन, संगमनेर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महोत्सव कवितांचा' आणि सन्मान सोहळ्यात नागपूर येथील साहित्यिक-कवी प्रवीण बागडे तसेच प्रभाकर सोमकुवर यांचा गौरव करण्यात येणार आहे. हा साहित्यिक आणि सांस्कृतिक सोहळा रविवार, १ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री कचेश्वर देवस्थान मंदिर, बोटा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवासाठी संगमनेर, राहुरी, पारनेर, जुन्नर, नागपूर आणि अकोला या विविध तालुक्यांमधून निवडक साहित्यिक, कवी, विचारवंत व सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींची निवड करण्यात आली आहे.

संमेलनाचे प्रमुख पाहुणे आधुनिक गाडगेबाबा डॉ. हरिभाऊ उगले राहणार असून स्वागताध्यक्ष म्हणून कृषी उपसंचालक श्री प्रविण गवांदे यांची उपस्थिती लाभणार आहे. काव्यसंमेलनात प्रवीण बागडे हे सामाजिक वास्तवावर भाष्य करणाऱ्या आशयपूर्ण आणि संवेदनशील कवितांचे सादरीकरण करणार आहेत. सामाजिक प्रश्नांवरील परखड मांडणी, प्रखर शब्दशैली आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन यामुळे प्रवीण बागडे यांच्या कविता वाचक-श्रोत्यांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरल्या आहेत. त्यांच्या सहभागामुळे 'महोत्सव कवितांचा' या साहित्यिक सोहळ्याची उंची अधिक वाढली असून साहित्यप्रेमी आणि रसिकांकडून त्यांच्या निवडीचे स्वागत व कौतुक होत आहे. या महोत्सवातून कवितेच्या माध्यमातून सामाजिक जाणीव जागृत करण्याचा आणि नव्या प्रतिभांना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजक गौतम वाघमारे यांनी सांगितले आहे.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत मेरा बुद्रुकच्या लेकीचा डंका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे /चिखली तालुका प्रतिनिधी : कराटे खेळाचा प्रसार व्हावा मुला,मुलींना आत्मसंरक्षणाचे महत्व कळावे करिता वाशिम जिल्हा कराटे असोसिएशन आयोजित दिनांक १७,१८ जानेवारी २०२६ रोजी वाशिम येथे ७ व्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते,मुलींच्या अंडर १५ वयोगटात, चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक गावाची, शेतकरी कन्या कु. रुद्राणी सुधीर पडघान वय १२ वर्षे हिने राज्यस्तरीय स्पर्धेत पहिल्याच राऊंड मध्ये १ सुवर्ण पदक (गोल्ड मेडल) व दुसऱ्या राऊंड मध्ये पुन्हा १ सुवर्णपदक असे एकूण दोन पदक पटकावले,यापूर्वी सुद्धा वयाच्या ५ व्या वर्षी मिस इंडिया सुष्मितासेन आयोजित ज्युनियर फॅशन शो गटात मराठमोळी वेशात, मुंबई येथे विशेष पुरस्कार प्राप्त केला होता. या मुळे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील वर्ग ६ वी मधील विद्यार्थीनी हिने अतिशय धाडसाने मिळविले यशाबद्दल सेंट इंग्लिश हायस्कूल बुलडाणा या शाळेत तिचा सत्कार करण्यात आला, जिल्हाभरातून रुद्राणीचे अभिनंदन करण्यात येत आहे, यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यां यांचे मनोबल वाढले आहे.रुद्राणी व तिचे पालक सुधीर पडघान यांनी याचे श्रेय कोच श्री.रोहितजी सोनारे सर व संपूर्ण टीमला दिले आहे.राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत दोन सुवर्णपदक पटकावल्याने कु. रुद्राणीवर चिखली तालुक्यासह मेरा बुद्रुक मधून अभिनंदन आता वर्षा होत आहे.

**ग्रामीण भागातल्या रुद्राणी पटकावले राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत २ सुवर्णपदक**



# मुंबई येथील भाविकाकडून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास ५१ हजार रुपयांची देणगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास आज दि. २५ जानेवारी रोजी मुंबई येथील भाविक सौ. सुशिला जयंतीलाल कानकीया यांनी कै. मदन मुकुंद मेस्त्री व कै. मथुरा मदन मेस्त्री यांच्या पावन स्मरणार्थ रुपये ५१,०००/- (एकावन्न हजार) इतकी देणगी अर्पण केली आहे.

या देणगीबद्दल मंदिर समितीच्या वतीने देणगीदारांचा व्यवस्थापक संदेश भोसले यांच्या हस्ते मंदिर समितीची दैनंदिनी व दिनदर्शिका देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदारांचे कुटुंबीय तसेच मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

सद्यस्थितीत, माघी यात्रेचा कालावधी सुरू असून, भाविकांची गर्दी वाढत आहे. देणगी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी QR CODE, RTGS, संकेतस्थळ, मोबाईल प ची सुविधा उपलब्ध असून, देणगीसाठी इच्छुक भाविकांनी श्री संत तुकाराम भवन येथील कार्यालयास संपर्क साधावा असे विभाग प्रमुख राजेश पिटले यांनी यावेळी सांगितले.



# केंद्राकडून पुरस्कारांची घोषणा; धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण

(पान १ वरून...)

२०) श्री. अनिल कुमार रस्तोगी – उत्तर प्रदेश २१) श्री. अंकेगोवडा एम. – कर्नाटक २२) अर्मिडा फर्नांडिस – महाराष्ट्र २३) श्री. अरविंद वैद्य – गुजरात २४) श्री. अशोक खाडे – महाराष्ट्र २५) श्री. अशोक कुमार सिंग – उत्तर प्रदेश २६) श्री. अशोक कुमार हलदार – पश्चिम बंगाल २७) श्री. बलदेव सिंग – पंजाब २८) श्री. भगवंदास रायकवार – मध्य प्रदेश २९) श्री. भारत सिंग भारती – बिहार ३०) श्री. भिखल्या लाडक्या ढिंढा – महाराष्ट्र ३१) श्री. बिश्वा बंधू (मरणोत्तर) – बिहार ३२) श्री. ब्रिज लाल भट – जम्मू व काश्मीर ३३) श्री. बुद्धा रश्मी मणी – उत्तर प्रदेश ३४) डॉ. बुद्धी ताती – छत्तीसगड ३५) डॉ. चंद्रमौलि गड्डामणुगू – तेलंगणा ३६) श्री. चरण हेंब्रॉम – ओडिशा ३७) श्री. चिरंजी लाल यादव – उत्तर प्रदेश ३८) सौ. दीपिका रेड्डी – तेलंगणा ३९) श्री. धर्मिकलाल चुनिलाल पंड्या – गुजरात ४०) श्री.गड्डे बाबू राजेंद्र प्रसाद – आंध्र प्रदेश ४१) श्री. गफुरुद्दीन मेवाजी जोगी – राजस्थान ४२) श्री. गंभीर सिंग योंझोन – पश्चिम बंगाल ४३) श्री. गरिमेला बालकृष्ण प्रसाद (मरणोत्तर) – आंध्र प्रदेश ४४) सौ. गायत्री बालसुब्रमण्यम आणि सौ. रंजनी बालसुब्रमण्यम (दुहेरी) – तामिळनाडू ४५) श्री. गोपाल जे. त्रिवेदी – बिहार ४६) श्री. गूडूरू वेंकट राव – तेलंगणा ४७) श्री. एच. व्ही. हांडे – तामिळनाडू ४८) श्री. हॅली वार – मेघालय ४९) श्री. हरी माधव मुखोपाध्याय (मरणोत्तर) – पश्चिम बंगाल ५०) श्री. हिराचरण सैकिया – आसाम ५१) सौ. हरमनप्रीत कौर – पंजाब ५२) श्री. इंदरजीत सिंग सिधू – चंदीगड ५३) श्री. जानार्दन बापूराव बोथे – महाराष्ट्र ५४) श्री. जोगेश देऊरी – आसाम ५५) श्री. जुजेर वासी – महाराष्ट्र ५६) श्री. ज्योतिष देबनाथ – पश्चिम बंगाल ५७) श्री. के. पाजनिवेल – पुदुच्चेरी ५८) श्री. के. रामासामी – तामिळनाडू ५९) श्री. के. विजय कुमार – तामिळनाडू ६०) श्री. कबिंद्र पुर्कायस्थ (मरणोत्तर) – आसाम ६१) श्री. कैलाश चंद्र पंत – मध्य प्रदेश ६२) सौ. कलामंडलम विमला मेनन – केरळ ६३० श्री. केवल कृष्ण ठाकराल – उत्तर प्रदेश ६४) श्री. खेम राज सुंद्रीयाल – हरियाणा ६५) सौ. कोल्लकल देवकी अम्मा जी. – केरळ ६६) श्री. कृष्णमूर्ती बालसुब्रमण्यम – तेलंगणा ६७) श्री. कुमार बोस – पश्चिम बंगाल ६८) श्री. कुमारस्वामी थंगाराज – तेलंगणा ६९) प्रा. (डॉ.) लार्स-क्रिश्चन कोख – जर्मनी ७०) सौ. ल्युडमिला विक्टोरोव्हना खोखलोव्हा – रशिया ७१) श्री. माधवन रंगनाथन – महाराष्ट्र ७२) श्री. मगंती मुरली मोहन – आंध्र प्रदेश ७३) श्री. महेंद्र कुमार मिश्रा – ओडिशा ७४) श्री. महेंद्र नाथ रॉय – पश्चिम बंगाल ७५) श्री. मामिडाला जगदीश कुमार – दिल्ली ७६) सौ. मंगला कपूर – उत्तर प्रदेश ७७) श्री. मीर हाजीभाई कासंभाई – गुजरात

७८) श्री. मोहन नगर – मध्य प्रदेश ७९) श्री. नारायण व्यास – मध्य प्रदेश ८०) श्री. नरेश चंद्र देव वर्मा – त्रिपुरा ८१) श्री. निलेश विनोदचंद्र मंडलवाला – गुजरात ८२) श्री. नुरुद्दीन अहमद – आसाम ८३) श्री. ओथुवार थिरुथणी स्वामिनाथन – तामिळनाडू ८४) डॉ. पद्मा गुरमेट – लडाख ८५) श्री. पालकोंडा विजय आनंद रेड्डी – तेलंगणा ८६) सौ. पोखिला लेखनी – आसाम ८७) डॉ. प्रभाकर बसवराजभाऊ कोरे – कर्नाटक ८८) श्री. प्रतीक शर्मा – अमेरिका ८९) श्री. प्रविण कुमार – उत्तर प्रदेश ९०) श्री. प्रेम लाल गौतम – हिमाचल प्रदेश

९१) श्री. प्रोसेनजित चॅटर्जी – पश्चिम बंगाल ९२) डॉ. पुन्नामूर्ती नटेसन – तामिळनाडू ९३) श्री. आर. कृष्णन (मरणोत्तर) – तामिळनाडू ९४) श्री. आर. व्ही. एस. मणी – दिल्ली ९५) श्री. रबीलाल टुडु – पश्चिम बंगाल ९६म श्री. रघुपत सिंग (पश्चात्तापीन) – उत्तर प्रदेश ९७) श्री. रघुवीर तुकाराम खेड़कर – महाराष्ट्र ९८) श्री. राजाजपत्टी केलीअप्पा गौंदर – तमिळनाडू ९९) श्री. राजेंद्र प्रसाद – उत्तर प्रदेश १००) श्री. रामा रेड्डी मामिडी (पश्चात्तापीन) – तेलंगणा १०१) श्री. राममूर्ती स्रीधर – दिल्ली १०२) श्री. रामचंद्र गोडबोले आणि सुनीता गोडबोले (दुयु) – छत्तीसगढ १०३) श्री. रतीलाल बोरीसागर – गुजरात १०४) श्री. रोहित शर्मा – महाराष्ट्र १०५) सुश्री. एस. जी. सुषीलम्मा – कर्नाटक १०६) श्री. सांग्युसंग एस. पोंगेनर – नागालँड १०७) संत निरंजन दास – पंजाब १०८) श्री. सरत कुमार पात्रा – ओडिशा १०९) श्री. सरोज मंडल – पश्चिम बंगाल ११०) श्री. सतीश शाह (पश्चात्तापीन) – महाराष्ट्र १११) श्री. सत्यनारायण नुवाल – महाराष्ट्र ११२) सुश्री. सविता पुनिया – हरियाणा ११३) प्रा. शफी शौक – जम्मू आणि काश्मीर ११४) श्री. शशी शेखर वेम्पती – कर्नाटका ११५) श्री. श्रीरंग देवाबा लाड – महाराष्ट्र ११६) मिस. शुभा वेंकटेशा आयंगर – कर्नाटका ११७ श्री. श्याम सुंदर – उत्तर प्रदेश ११८ श्री. सिमंचल पात्रो – ओडिशा ११९ मिस. सिवसंकरी – तमिळनाडू १२० डॉ. सुरेश हनगवाडी – कर्नाटका १२१ स्वामी ब्रह्मदेव जी महाराज – राजस्थान १२२ श्री. टी. टी. जगन्नाथन (पोथुमस) – कर्नाटका १२३ श्री. टागा राम भेल – राजस्थान १२४ श्री. तरुण भट्टाचार्य – पश्चिम बंगाल १२५ श्री. टेचि गबिन – अरुणाचल प्रदेश १२६ श्री. थिरुवरूर बख्तवाथसलाम – तमिळनाडू १२७ मिस. त्रिप्ती मुखर्जी – पश्चिम बंगाल १२८ श्री. वीझिनाथन कामकोटी – तमिळनाडू १२९ श्री. वेम्पती कुटुम्ब शास्त्री – आंध्र प्रदेश १३० श्री. व्लादिमीर मेस्तिवरिश्विली (पोथुमस) – जॉर्जिया १३१ श्री. युमन जनत्रा सिंग (पोथुमस) – मणिपूर